ग्रामपंचायत अधिकारी (गट-क) या संवर्गातील सेवानिवृत्त कर्मचा-यांची वयाची ५५ वर्ष पूर्ण झालेने किंवा सेवेस ३० वर्ष पुर्ण झालेने सेवेचे पुनर्विलोकनास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-२
जिल्हा परिषद आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-१/२६६/२०२६
अहिल्यानगर दिनांक:- स्वाक्षरीखाली नमूद केलेप्रमाणे

वाचा:- १. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्र:एलपीएल-२०१७/ प्र.क्र.२१/का.पंधरा/दिनांक १० जुन २०१९
२. दिनांक २२/०५/२०२६ रोजीच्या पूनर्विलोकन समितीच्या बैठकीचे इतिवृत्त

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयातील तरतूदीनुसार गट क व गट ड कर्मचा-यांच्या बाबतीत त्यांच्या वयाच्या ५५ व्या वर्षी किंवा त्यांच्या अर्हताकारी सेवेची ३० वर्षे पूर्ण होतेवेळी यापैकी जे अगोदर घडेल तेव्हा पुनर्विलोकन करण्यात यावे अशी तरतुद आहे. पात्रतेसाठी विहित केलेले निकष पूर्ण करणारे ग्रामपंचायत अधिकारी (गट-क) या संवर्गातील खालील विवरणपत्र अ मधील कर्मचारी यांची वयाची ५५ वर्ष पूर्ण झालेले व विवरणपत्र ब माधिक कर्मचारी यांचे सेवेस ३० वर्ष पुर्ण झाल्याने सेवेसाठी पात्र असलेचे आढळले आहे.

विवरणपत्र अ

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | तालुका | अर्हताकारी सेवेची ३० वर्षे पुर्ण झालेचा दिनांक |
|---|---|---|---|
| १. | श्री.रामचंद्र अभिमन्यू शिंदे | जामखेड | ११-०९-२०१४ |
| २. | श्री. सुखदेव रखमा वायाळ | पाथर्डी | ०९-०२-२०१७ |

वरील विवरणपत्र अ मधील ग्रामपंचायत अधिकारी यांच्या अर्हताकारी सेवेस ३० वर्षे पुर्ण झाल्याने सेवेसाठी पात्र ठरविण्यास कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.

सदर आदेशाची त्वरीत अंमलबजावणी करण्यात येऊन सदर आदेशाची नोंद संबधित ग्रामपंचायत अधिकारी यांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्रमांक 202607060600096 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 06-07-2026 18:56:07
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,
आदेशातील सर्व संबंधित ग्रामपंचायत अधिकारी
व्दारा व प्रत-गट विकास अधिकारी, पंचायत समिती नेवासा, अहिल्यानगर,राहाता, राहुरी, श्रीगोंदा, श्रीरामपूर, संगमनेर
प्रत :- मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर .
प्रत :- निवडनस्ती